॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

''ज्ञानतीर्थ'' परिसर, विष्णुपूरी, नांदेड - ४३१ ६०६ (महाराष्ट्र)

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded – 431 606 (Maharashtra)

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited 'B++'grade

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड.

आज़ादी का अमृत महोत्सव

**MEETING & ELECTION SECTION**

| Phone : (02462) 215246<br>Fax : (02462) 215572 | Website:<br>Srtmun.ac.in | E-Mail :<br>election@srtmun.ac.in |
|---|---|---|


जा.क्र. सभा व निवडणूक/२०२२–२३/1417 दिनांक : २३/०२/२०२३

## परिपत्रक

### मतपत्रिकेवर मत नोंदविणे, मतपत्रिका अवैध ठरविणे, इत्यादीबाबतची सविस्तर सूचना / नियमावली.

सर्व संबंधितांना या परिपत्रकान्वये कळविण्यात येते की, विद्यापीठामार्फत निवडणुकीसंदर्भात कार्यवाही सुरू असुन दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३, ०२ मार्च, २०२३ व दिनांक १४ मार्च, २०२३ रोजी अभ्यासमंडळाच्या पहिल्या बैठकीमध्ये अभ्यासमंडळामधून एकाची अध्यक्ष म्हणून निवड करावयाची आहे.

त्या अनुषंगाने मतपत्रिकेवर मत नोंदविणे, मतपत्रिका अवैध ठरविणे इत्यादीबाबत सविस्तर माहिती महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतूदीन्वये व महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार–ब, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे दिनांक १७ मे, २०१७ च्या अधिसूचनेत नमुद एकरूप परिनियम क्रमांक १ मधील तरतुदी च्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

**मतदारांसाठी महत्वाच्या सूचना :–**

**मतपत्रिकेवर मत नोंदविणे, मतपत्रिका अवैध ठरविणे इत्यादीबाबतची सविस्तर नियमावली**

**(अ) मतपत्रिकेवर मत नोंदविणे:–**

१. प्रत्येक मतदारास एक हस्तांतरणीय मत असेल

२. मतदार त्याचे मत नोंदवताना:

(क) **''पसंतीक्रम''** या स्तंभात ज्या उमेदवाराला मतदान करावयाचे आहे त्या उमेदवाराच्या नावासमोर त्याच्या मतपत्रिकेवर अंक १ नमूद करील.

(ख) याशिवाय, त्याला जेवढ्या अन्य उमेदवारांना मत द्यावयाचे असेल त्यांच्या संबंधित नावासमोर त्याची निवड किंवा पसंतीक्रम अंक २,३,४ असे सलग अंक नमूद करून दर्शवेल;

(ग) एका मतपत्रिकेवर दोन भाषेत पसंतीक्रम नमूद करू नयेत.

(घ) सर्व पसंतीक्रम एकतर इंग्रजी भाषेत किंवा मराठी भाषेत नमूद करावेत.

(ङ) पसंतीक्रम, अक्षरी किंवा रोमन अंकात नमूद करता येणार नाही.

३. अभ्यासमंडळाच्या बैठकीमध्ये मतपत्रिकेवर पसंती क्रमांक नोंदविण्यासाठी जो पेन पुरविला जाईल त्याच पेनने पसंतीक्रम नोंदवावयाचा आहे.

४. मतपत्रिकेवर पसंती क्रमांक १ नोंदविणे आवश्यक आहे.

५. मतदानासाठी देण्यात येणाऱ्या सर्व मतपत्रिकांवर त्यांच्या पसंतीनुसार क्रमांकाची नोंद अंकी (जसे– १,२) स्वरूपात करावी. पसंतीदर्शक आकडे अंकातच इंग्रजी किंवा मराठी यापैकी कोणत्याही एका भाषेत परंतु एकाच पध्दतीने लिहिणे आवश्यक आहे. पसंतीक्रम, अक्षरी किंवा रोमन अंकात नमूद करू नये. मतदाराने आपल्या पसंतीचे प्रथम क्रमांकाचे मत हे मतपत्रिकेवर नोंदविलेच पाहिजे. तसे न केल्यास मतपत्रिका अवैध ठरेल.

**ब) मतपत्रिका अवैध ठरणे:—**

मतपत्रिकेत जर .....

क) प्रथम पसंतीक्रम दर्शवणारा केवळ अंक १ दर्शवण्यात आला नसेल,

किंवा

ख) प्रथम पसंतीक्रम दर्शवणारा केवळ अंक १ एकापेक्षा अधिक उमेदवारांच्या नावासमोर दर्शविण्यात आला असेल,

किंवा

ग) प्रथम पसंतीक्रम दर्शवणारा केवळ अंक १ व काही अन्य अंक एकाच उमेदवारांच्या नावासमोर दर्शविण्यात आले असतील;

किंवा

घ) प्रथम पसंतीक्रम किंवा त्यापुढील पसंतीक्रम, शब्दात किंवा रोमन अंकात किंवा इंग्रजी किंवा मराठी भाषा वगळून कोणत्याही अन्य भाषेच्या अंकात दर्शविण्यात आले असतील;

किंवा

ङ) प्रथम पसंतीक्रम नोंदविण्यात आलेला उमेदवार निर्धारित करता येत नसेल;

किंवा

च) मतदाराने निवडणुकीमध्ये मतपत्रिकेवर जे नंतर ओळखता येईल असे कोणतेही चिन्ह नमूद केले असेल;

किंवा

छ) निळया शाईखेरीज अन्य कोणत्याही शाईने पसंती दर्शविली असेल;

किंवा

ज) मतदाराची पसंती दर्शविणाऱ्या अंकांमध्ये कोणतीही खाडाखोड, गिरवागिरव किंवा फेरफार केला असेल,

किंवा

झ) मतदारांनी मतपत्रिकेवर पसंतीक्रम नोंदविल्यावर सदर मतपत्रिका इतरांना दाखविल्यास मतपत्रिका बाद केली जाईल.

ञ) मतपत्रिकेवर फुलीची **(X)** किंवा **(✓)** बरोबरची खुण करून मत नोंदविलेले असल्यास,

ट) पसंती क्रमांक योग्य त्या दिलेल्या जागेवर नमूद केले नसल्यास.

ठ) पसंतीचे क्रमांक १,२,३,४ ऐवजी ०१,०२,०३,०४ असे क्रमांक नोंद केल्यास मतपत्रिका अवैध ठरेल.

ड) एकापेक्षा अधिक उमेदवारांना देण्यात आलेला पुढील पसंतीक्रम असलेली वैध मतपत्रिका अशा लगतनंतरच्या पसंतीक्रमासाठी मतपत्रिका अवैध ठरेल.

**क) मतदारांसाठी इतर सूचना:—**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणांच्या व मंडळांच्या निवडणुका घेणेबाबतची कार्यपध्दती) सन २०१७ च्या एकरूप परिनियम क्रमांक १ मधील कलम १० (८) मध्ये खालील प्रमाणे तरतूद करण्यात आलेली आहे.

**'जर वैध नामनिर्देशनाची संख्या, भरावयाच्या रिक्त पदांच्या संख्येपेक्षा अधिक नसेल तर, निवडणुकीचा निकाल जाहीर करण्याच्या दिनांकास नामनिर्देशित केलेल्या उमेदवारांना निवडून आले असल्याचे घोषित करण्यात येईल.'**

वरील तरतूदीच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, सदर प्राधिकरण निवडणुकीसाठी प्राप्त झालेल्या नामनिर्देशन अर्जांची संख्या सदर प्राधिकरण गटामध्ये निवडून यावयाच्या पदांच्या संख्येएवढी किंवा त्यापेक्षा कमी असल्यास या प्राधिकरण गटाच्या निवडणुका घेतल्या जाणार नाहीत, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

कुलसचिव
तथा निवडणूक अधिकारी

जा.क्र. सभा व निवडणूक/२०२२—२३/1417
दिनांक : २३/०२/२०२३